प्रेसनोट

## स्वच्छ विद्यालय पुरस्कार सन 2017-18 मध्ये सहभागात कोल्हापूर जिल्हा राज्यात प्रथम व राज्याचा देशात 11 वा क्रमांक - 100 % शाळांचा सहभाग

भारत सरकारने दि. 02/10/2014 पासून संपूर्ण देशात स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात केली असून देशातील सर्व शाळांसाठी सन 2015-16 पासून स्वच्छ विद्यालय पुरस्कार सुरू करण्यात आलेला आहे. गेल्या दोन वर्षापासून राबविणेत येणाऱ्या देशपातळीवरील स्वच्छ विद्यालय अभियानमध्ये या वर्षी कोल्हापूर जिल्ह्यातील 100% शाळांची सहभाग घेत आपली माहिती बिनचूक भरलेने सहभागामध्ये जिल्हा राज्यामध्ये पहिल्या क्रमांकावर आलेला आहे. देशपातळीवर महाराष्ट्र राज्याचा 11 वा क्रमांक असून यावर्षी राज्यात प्रथम क्रमांक मिळवावयाचा असा संकल्प जिल्हा परिषदेने केलेला आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत सन 2014-15 पासून देशभर स्वच्छ विद्यालय पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. 39 निकष असणाऱ्या शाळेस या स्पर्धेत विजयी होणाऱ्या विद्यालयाला रु. 50,000/- चा पुरस्कार देण्यात येणार आहे. स्वच्छतागृह, हात धुण्याची सवय, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधा इ. बाबींचा समावेश यामध्ये आहे. विशेष म्हणजे लोक सहभाग असल्याने माझे गाव माझी शाळा ही आपुलकी नागरिकांच्या मनामध्ये वाढीस लागली आहे. लोक सहभागातून शाळांमध्ये अनेक चांगले उपक्रम करता येतात ही गोष्ट ही या स्पर्धेतून साध्य झाली आहे. अनेक गावांनी शाळांमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर प्युरिफायर मशीन्स, हात स्वच्छ करण्यासाठी लिक्विड सोफ इ. ची व्यवस्था करुन देण्याबरोबरच स्वच्छतागृह बांधकामासाठी काही संस्थांनी मदत केलेली आहे. सदर उपक्रमांमध्ये जिल्हा परिषद शाळांबरोबरच अनुदानित, विनाअनुदानित, स्वयंअर्थसहाय्यित आणि खाजगी आणि शासकीय शाळांनी खालीलप्रमाणे सहभाग नोंदविला आहे.

| अ.क्र. | तालुका | स्वच्छ विद्यालय पुरस्कार उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या शाळांची संख्या |
|---|---|---|
| 1 | आजरा | 172 |
| 2 | भुदरगड | 230 |
| 3 | चंदगड | 284 |
| 4 | गडहिंग्लज | 234 |
| 5 | गगनबावडा | 87 |
| 6 | हातकणंगले | 535 |
| 7 | कागल | 241 |
| 8 | करवीर | 350 |
| 9 | पन्हाळा | 319 |
| 10 | राधानगरी | 285 |
| 11 | शाहूवाडी | 333 |
| 12 | शिरोळ | 304 |
| 13 | कोल्हापूर म.न.पा. | 290 |
| | एकूण - | 3664 |

सदर उपक्रम यशस्वी करणेसाठी जिल्हा परिषद अध्यक्ष मा. सौ. शौमिका महाडिक, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. डॉ. कुणाल खेमनार, सभापती शिक्षण व अर्थ समिती मा. अंबरिषसिंह घाटगे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) मा. सुभाष चौगुले, शिक्षणाधिकारी (माध्य.) मा. किरण लोहार, स्वच्छ विद्यालय टास्क फोर्स समिती सदस्य यांचे मार्गदर्शन तसेच सर्व गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समिती यांचे सहकार्य लाभले.

**श्री. सुभाष चौगुले**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

प्रति,
मा. संपादक, दैनिक ----------------
महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपल्या लोकप्रिय दैनिकातून सदरची बातमी प्रसिध्द करून सहकार्य करावे.

**श्री. सुभाष चौगुले**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**